MHKO100008322012

**नि. दि. दा. क्र. २६२/२०१२**
**समीर हिडदुगी वि. शांता हिडदुगी,**

## निशाणी क्र. १७ खालील आदेश

**१.** प्रतिवादीतर्फे प्रस्तुत अर्ज त्यांच्याविरुध्द झालेला 'उलटतपास नाहीचा आदेश' रद्द करुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** प्रतिवादी चे असे म्हणणे आहे की, ते जाणून बुजून मे. कोर्टानी पुकारले असता गैरहजर राहिलेले नाहीत. सदर प्रतिवादी तर्फे वटमुखत्यार धारक हे मौजे भडगांव या गावी राहत असून सध्या गडहिंग्लज चंदगड रस्त्याचे काम चालू असलेने सदर रस्त्यावर ट्रॅफिक होत असलेने त्यांना मे. कोर्टात हजर होणेस विलंब झालेला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांच्याविरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारित करण्यात आला. प्रतिवादी यांचा उलटतपास घेणे गरजेचे आहे, प्रतिवादीला उलटतपास घेण्याची परवानगी नाकारली गेली तर प्रतिवादीचे होणारे नुकसान कशानेही भरून निघणार नाही. त्यामुळे 'उलटतपास नाहीचा आदेश' रद्द करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

**३.** या उलट, वादीच्या विधीज्ञांनी असे म्हणणे दिले की, प्रतिवादी हे जाणुन-बुजुन सदरचा दावा प्रलंबित ठेवत आहेत. सदरचा अर्ज हा चुकीचा असुन वादी यांना जास्तीचा दंड लावण्यात यावा.

**४.** प्रतिवादी व वादी यांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

**५.** वादी यांनी त्यांच्या साक्षीदाराच्या साक्षीपुराव्याचे शपथपत्र दिनांक

१२/०३/२०२१ रोजी दाखल केले होते. प्रतिवादी यांना उलटतपास घेण्याकरीता संधी देण्यात आली होती, परंतु त्यांनी उलटतपास घेतला नाही त्यामुळे प्रतिवादी यांच्याविरुध्द दिनांक ०२/०७/२०२६ रोजी उलटतपास नाही असा आदेश पारित करण्यात आला आहे. तसेच प्रतिवादी यांनी अर्जात उलटतपास न घेण्याचे कोणतेही उचित कारण नमूद केले नाही. तसेच प्रकरण हे १४ वर्ष जुने आहे. परंतु, प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्याकरिता वादीच्या साक्षीदाराचा उलटतपास घेणे गरजेचे आहे. याकरिता, प्रतिवादीस उलटतपासाची संधी देणे योग्य व संयुक्तीक आहे. तसेच न्यायाच्या दृष्टीने प्रस्तुत अर्ज मंजूर करणे गरजेचे आहे. मात्र प्रतिवादी यांनी केलेल्या विलंबामुळे वादीला जो असोयीस्करपणा झाला, त्याकरीता प्रतिवादी यांना खर्च लावणे योग्य व संयुक्तिक आहे. करिता, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

**१.** सदरचा अर्ज प्रतिवादी यांनी वादीस रक्कम रु. ८००/- देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

**२.** प्रतिवादीविरुद्ध झालेला 'उलटतपास नाही आदेश' रद्द करण्यात येतो व उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ASMA TUKARAM GITTE
Date: 2026.07.24 17:23:23 +0530

**(श्रीमती ए. टी. गित्ते)**

दि. २३/०७/२०२६.

२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

गडहिंग्लज.